**प्रपत्र - ब**

**पुणे विभागातील पुणे,सातारा,कोल्हापूर व सोलापूर या जिल्हयातील महामंडळाचे ताब्यात असलेल्या जमिनीची प्रलंबित प्रश्नांची जिल्हावार यादी.**

**दिनांक : २ जानेवारी, २०१२**

| अ.क्र. | ठिकाण | ताब्या घेतल्याचा दिनांक | स.नं./गट नं. न.भू.क्रमांक | एकूण क्षेत्र चौ.मी. | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १. | **जिल्हा - सातारा**<br>मौजे कोयनानगर, ता. पाटण, | १६/३/२००७ | ११/ब/१ | १०० | पर्यटक स्वागत केंद्र खाजगी उद्योजकास अल्पमुदतीच्या भाडेपट्टयाने दि. ४/१२/२००६ पासून चालविण्यास दिले आहे. तथापि, सदर जमीन महामंडळाचे नावे दाखल करुन घेणेबाबत महामंडळाचे पुणे येथील विभागीय कार्यालयातर्फे पाठपुरावा सुरु आहे. |
| २. | मौजे महाबळेश्वर, ता.वाई. | २०/१/१९७५ | १ ते ४ | ६०७०३ | महामंडळाच्या निर्मितीपासून सदर जमीन शासनाचे भाग-भांडवल स्वरुपात महामंडळाकडे हस्तांतरीत झाली आहे. तेव्हापासून तहसिलदार-वाई व जिल्हाधिकारी, सातारा यांचे कार्यालयाशी पाठपुरावा सुरु होता. तथापि, याबाबत सा.बां. विभाग, पुणे यांचेकडील ना हरकत दाखला ची आवश्यकता असल्याने त्यासाठी दि. १०/१०/१९९७ पासून त्यांचेकडे पाठपुरावा करण्यात आला. परंतु त्यांचेकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर बाब दि. १/१/१९९९ चे अ.शा. पत्रान्वये श्री. अ.बा.पवार, सचिव, सा.बां. विभाग, मंत्रालय यांचे निदर्शनास आणुन देण्यात आली. जमिनीचा मूळ मालकी हक्क मा. राजेसरकार (मा. राज्यपाल) यांचे नावे असल्याने पुढो सा.बां. विभाग, पुणे यांनी त्यांचेकडील दि. ३०/३/१९९९ अन्वये सदर प्रकरण हे क्षेत्राच्या विभागणी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | कामी मा. राज्यपाल, यांचे परिवार प्रबंधक, मुंबई यांचेकडे हरकत किंवा कसे याबाबत विचारणा करण्यासाठी पाठविण्यात आले. सदर पत्रानुसार महामंडळातर्फे दि. १७/९/१९९९ पासून मा. राज्यपाल यांचे प्रबंधक कार्यालयाशी सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. सदर कार्यालयातर्फे या प्रकरणी सा.बां. विभाग, पुणे यांचकडून काही माहितीची विचारणा केली असल्याचे दि. १०/६/२००६ चे पत्रान्वये महामंडळात कळविणेत आले. याबाबत महामंडळाचे पुणे येथील कार्यालयातर्फे पाठपुरावा सुरु आहे. प्रकरणी सा.बां. विभाग, पुणे आणि मा. राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, मुंबई या कार्यालयाकडे प्रलंबित आहे. |
| ३. | शिखर-शिंगणापूर, ता. माण. | २१/९/१९९२ (आगाऊताबा) | ६५४-अ व ब | ३७२०० | जमिनीचा प्रस्ताव दि. ८/५/१९९२ अन्वये जिल्हाधिकारी, सातारा यांना पाठविणात आला आहे. प्रकरण शासनाचे मंजुरीसाठी आयुक्त, पुणे यांचेकडील दि. ११/६/१९९० चे पत्रान्वये महसूल व वनविभागास पाठविणेत आले आहे. महामंडळातर्फे दि. २३/६/१९९८ पासून प्र.स. (महसूल) यांचेकडे सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. याबाबत अनेक अ.शा. पत्रे महसुल विभागस पाठविणेत आली आहेत. तसेच सदर प्रकरण शासन स्तरावर घेऊन पाठपुरावा करणेबाबत शासनाचे पर्यटन विभागास विनंती करण्यात आली आहे.<br><br>प्रकरणी पर्यटन विभाग आणि महसूल व वनविभाग यांचेकडे पाठपुरावा सुरु आहे याबाबत दि. ५/५/२०१० रोजी शेवटचे अ.शा. पत्र पाठविणेत आले आहे. प्रकरण सदर दोन्ही विभागाकडे प्रलंबित आहे. |

<u>**प्रपत्र - ब**</u>

<u>**महामंडळाकडे ताब्यात/वर्ग झालेल्या जमिनीची ७/१२ उता-यात अद्याप नोंद दाखल झालेली नसल्याची जमिनीची यादी.**</u>

| **अ.क** | **ठिकाण** | **स.नं./गट नं./ न.भू.क्र.** | **क्षेत्र चौ.मी.** | **भागभांडवल/शासकीय/खाजगी संपादित** |
|---|---|---|---|---|
| १. | **जिल्हा – सातारा**<br>मौ. शिखर शिंगणापुर<br>ता. माण | ६५४ ब<br>आगाऊ ताबा | २०००० | शासकीय |
| २. | कोयनानगर (नेहरु गार्डन)<br>ता. पाटण | ११/ब १ | १०.७६ | शासकीय |
| ३. | मौ. महाबळेश्वर<br>ता.वाई | स.नं. १ ते ४ | ६०७०३ | भागभांडवल |
| ४. | मौ.खेंगर (पाचगणी)<br>ता.वाई | १२ क, १२ ब व १३ | १४७०० | भागभांडवल |